# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- १९१-२२** **दिनांक :- २३/०६/२०२२**

**४१.५ ग्रॅम वजनाचा एम.डि. (मेफेड्रॉन) बाळगणाऱ्या नायजेरियन इसमावर कारवाई-अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची कामगिरी.**

दिनांक २२.०६.२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे परिमंडळ ०२ व ०३ मध्ये गस्त करत असतांना तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये सेंट्रल फ्रान्सिस चर्च समोर, नालासोपारा पुर्व येथे नायजेरियन इसम संशयास्पदरित्या फिरतांना दिसून आला. त्यानुसार सदर ठिकाणी सापळा रचुन नायजेरियन इसमास ताब्यात घेवुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पंचासमक्ष नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव ओगबोन्ना मधुआबची आयझाया, वय-४८ वर्ष सध्या रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर, मुळ रा. देश-नायजेरियन असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ४१.५ ग्रॅम वजनाचा एम.डि. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याचेकडुन एकुण ३,३२,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीताविरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३८७/२०२२ एन.डि.पी.एस. कायदा कलम ८ (क), २१ (ब) प्रमाणे दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री विजयकांत सागर, पोलीस उप.आयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. देविदास हंडोरे, सपोनि विलास कुटे, पोहवा/धनाजी इंगळे, पवन पाटील, पी. डी. टक्के, ए. आर. सपकाळ, एस. ए. आव्हाड, व्ही. ए. घरबुडे व पोशि/अे.बी.यादव सर्व नेम. अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांनी केली आहे.